## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १०६२/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.बाबू हरिबा नानगुरे**
मु.११३१, नवेदर (भिकारवाडी),
पो.आडिवरे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी ४१६ ७०७.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री.महाकाली इंग्लिश स्कूल, नवेदर आडीवरे,
ता.राजापूर, जि.रत्नागिरी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री.महाकाली इंग्लिश स्कूल, नवेदर आडीवरे,
ता.राजापूर, जि.रत्नागिरी.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.०८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०१.२०२० | -- | १५.०२.२०२० | १६.०३.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि. २५.०९.२०२०जीच्या अर्जान्वये *"माहिती दिली नाही."*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १२.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता ऑनलाईन उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुनिल बाबुराव दबडे, मुख्याध्यापक अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.युवराज माने, प्रभारी मुख्याध्यापक, श्री.महाकाली ई.स्कूल, नवेदर आडिवरे, ता.राजापूर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" जा.क्र.एसएमईएस/२७८/२०१९-२० दिनांक ३०.११.२०१९ या संदर्भीय पत्रात नमूद केलेली दिनांक १६.११.२०१९ रोजी पार पाडलेल्या शालेय समिती सभा विषय पत्रिकेची (सभेचा अजेंडा) साक्षांकित प्रत मिळावी. "*

सदर प्रकरणी तक्रारकर्ता यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. तक्रारकर्ता यांना दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर माहिती ही शाळा समिती सभा क्र.३, दि.१६.११.२०१९ चे इतिवृत्त आहे. तक्रारकर्ता यांनी दि.१६.११.२०१९ च्या सभेची विषय पत्रिका (अजेंडा) प्रत मिळावी अशी मागणी केली आहे. म्हणजेच त्यांना ज्या माहितीची मागणी केली होती ती पुरविण्यात आलेली नाही.

आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे योग्य ती माहिती म्हणजे दि.१६.११.२०१९ रोजी पार पाडलेल्या शाळा समिती सभा विषय पत्रिकेची प्रत त्यांना पुरविणे योग्य होईल. तसेच सदर माहिती पुरविणेबाबत झालेल्या विलंबासाठी यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी (माहिती अर्जाचा दि.०२.०१.२०२० ते आजपर्यंत कार्यरत असलेले सर्व जन माहिती अधिकारी)यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना दि.१६.११.२०१९ रोजी पार पाडलेल्या शाळा समिती सभा विषय पत्रिकेची प्रत १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनिल बाबुराव दबडे (माहिती अर्जाचा दि.०२.०१.२०२० ते आजपर्यंत कार्यरत असलेले सर्व जन माहिती अधिकारी) तथा मुख्याध्यापक, श्री.महाकाली ईंग्लिश स्कूल नवेदर आडिवरे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०२.०१.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन चूकीची माहिती पुरविली. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वतः

उपस्थित राहून आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनिल बाबुराव दबडे (माहिती अर्जाचा दि.०२.०१.२०२० ते आजपर्यंत कार्यरत असलेले सर्व जन माहिती अधिकारी) तथा मुख्याध्यापक, श्री.महाकाली इंग्लिश स्कूल, नवेदर आडीवरे,ता.राजापूर, जि.रत्नागिरी.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री.महाकाली इंग्लिश स्कूल, नवेदर आडीवरे,
ता.राजापूर, जि.रत्नागिरी.**यांचेमार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक २३.१०.२०२४ ( In Continuation of order dt.१२.०८.२०२४)

## विवेचन

उपरोक्त दि.१२.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वेय शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण देणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २३.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत. सदर प्रकरणी

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री महाकाली इंग्लिश स्कूल नवेदन (आडिवरे), ता.राजापूर यांनी दि.२३.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे लेखी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशानुसार त्यांनी दि.१६.११.२०१९ रोजी झालेल्या मिटिंगचा अजेंडा शोधला असता तो आढळून येत नाही. तसे तक्रारकर्ता यांना कळवीत होतो परंतु त्यांनी ते पत्र घेतले नाही. अशी जर वस्तुस्थिती असेल, तर मुख्याध्यापकांनी अशी महत्वाची कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री महाकाली इंग्लिश स्कूल नवेदन (आडिवरे), ता.राजापूर यांनी सदर महत्वाची कागदपत्रे गळाळ झाल्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करुन, त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्यावेळी आयोगासमोर स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२४ .